# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## **साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**

प्रभात पुणे, बुधवार, दि. १ फेब्रुवारी २०१७ 05

# चरित्र, चारित्र्यावर व्यक्तीचे यश अवलंबून

### अपर पोलीस महासंचालक, महानिरीक्षक डॉ. भूषणकुमार उपाध्याय

राजगुरुनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - कोणत्याही व्यक्तीचे यश हे त्याच्या चरित्र व चारित्र्यावर अवलंबून असून यासाठी चांगले विचार, वाणी आणि कर्म गरजेचे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. भूषण कुमार उपाध्याय यांनी राजगुरुनगर येथे केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'तरुणाईचे उत्तरदायित्व' या विषयावर ते बोलत होते.

चासकमान खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. भूषण कुमार उपाध्याय म्हणाले की, जीवनातील विधायक काम तरुण वयात असताना करायला हवे. त्यासाठी चांगले शिक्षण घ्यायला हवे. हल्लीच्या शिक्षणातून फक्त माहिती मिळते ज्ञान मिळत नाही असे खेद व्यक्त करून त्यांनी ज्या शिक्षणामुळे आपल्या जीवनात, समाजात, देशात व मानसिक बदल घडून येतो, ते खरे शिक्षण असते. जे शिकवले जाते ते



राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात व्याख्यानमालेत बोलताना डॉ. भूषणकुमार उपाध्याय. यावेळी उपस्थित विद्यार्थिनी.

मुलांना पटले पाहिजे. त्यातून योग्य अयोग्य काय, याचा निर्णय मुलांना करता यायला हवा. त्यासाठी आपण जे शिकतो त्याचे ज्ञानात रूपांतर करायला हवे. कारण समाज व देश सुरक्षित राहण्यासाठी चांगली माणसे गरजेची आहे. यासाठी ज्ञानाधारित शिक्षणाची गरज आहे. जीवनाला काम, लोभ, क्रोध, मद, मोह, मत्सर या षड्रिपूंनी घेरले असून सगळ्या समस्या या षड्रिपूंतून तयार झाल्या आहेत. त्यावर ताबा मिळवण्यासाठी मनाचे व्यवस्थापन आवश्यक असून अभ्यासाने मनावर नियंत्रण ठेवता येते असे त्यांनी सांगितले.

गुन्हेगारीबाबत ते म्हणाले की, ९५ टक्के गुन्ह्यांमधील कैदी गुन्हेगार नसतात. त्यांच्याकडून रागाच्या भरात गुन्हा झालेला असतो. त्याचा परिणाम मात्र, आपल्या भविष्यावर होतो. त्यासाठी मनावर नियंत्रण आवश्यक आहे. समाजात धार्मिक सहिष्णुता आवश्यक असून त्यासाठी आपापल्या धर्मांनी मार्गदर्शक तत्वे समजून घेऊन मग धर्माचा अर्थ लावा. 'सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया:' ही आपली संस्कृती आणि हे शिकवली नाही या हा संतविचार आत्म अंगीकारण्याची गरज व्यक्त केली. यावेळी 'ना तुम हिंदू बनेगा ना मुस्लिम बनेगा, इन्सान की औलाद है इन्सान ही बनेगा' [illegible] ओळी सादर केल्या. ते म्हणाले [illegible], जननी व जन्मभूमी ही स्वर्गापेक्षा मोठी असून तिची काळजी घ्या. नातीगोती जपा, नाती जपली तर संस्कृती जगेल. फक्त पैशाला माणूस जगत नाही, हे ध्यानात ठेवा. आईवडिलांची काळजी घ्या. वृद्धाश्रम व तुरुंगांना भेटी द्या. म्हणजे भविष्यात तुमचे पाय तिकडे वळणार नाही. आजचा तरुणच या देशाला पुढे नेऊ शकतो. त्यासाठी उत्तरदायित्वाची भावना मनात जिवंत ठेवा.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती काळुंज यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. उमेश जगताप यांनी केला तर कोमल पडवळ हिने आभार मानले.

लोकमत पुणे, बुधवार, दि. १ फेब्रुवारी २०१७ | ३

# चारित्र्यसंवर्धनासाठी चांगले विचार गरजेचे : उपाध्याय

राजगुरुनगर : 'कोणत्याही व्यक्तीला जीवनात यशस्वी होण्यासाठी चांगले चारित्र्य आवश्यक आहे. त्यासाठी चांगले विचार, वाणी आणि कर्माचीही जोड लागते,' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे कारागृह व सुधारसेवा विभागाचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'तरुणाईचे उत्तरदायित्व' या विषयावर ते बोलत होते. चासकमान खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी.जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण मुलामुलींना आवाहन करताना ते म्हणाले, की जननी व जन्मभूमी ही स्वर्गापेक्षा मोठी असून, तिची काळजी घ्या. नातीगोती जपा, नाती जपली तर संस्कृती जगेल. फक्त पैशावर माणूस जगत नाही हे ध्यानात ठेवा. आईवडिलांची काळजी घ्या. वृद्धाश्रम व तुरुंगांना भेटी द्या. म्हणजे भविष्यात तुमचे पाय तिकडे वळणार नाहीत. त्यासाठी उत्तरदायित्वाची भावना मनात जिवंत ठेवा, असे आवाहन त्यांनी केले. (वार्ताहर)

सकाळ
७

# तरुणांनी मनाचे व्यवस्थापन करणे गरजेचे

## अतिरिक्त पोलिस महासंचालक डॉ. उपाध्याय यांचे प्रतिपादन; राजगुरुनगर येथे व्याख्यान

राजगुरुनगर, ता.२ : तरुणांनी मनाचे व्यवस्थापन करणे आवश्यक झाले आहे. सत्कर्माने मनावर नियंत्रण ठेवता येते आणि त्यातून खऱ्या अर्थाने यशस्वी आयुष्य उभे राहते, असे प्रतिपादन राज्याच्या कारागृह व सुधारसेवा विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. भूषण कुमार उपाध्याय यांनी येथे केले.

येथील साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'तरुणाईचे उत्तरदायित्व' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

उपाध्याय म्हणाले, "समाजात धार्मिक सहिष्णुता आवश्यक असून, त्यासाठी आपापल्या धर्मांची मार्गदर्शक तत्त्वे समजून घेऊन मग धर्मांचा अर्थ लावावा. हे विश्वची माझे घर असे आपली संस्कृती सांगते. या विश्वातील सर्व जीवमात्र सुखाने नांदावेत अशी प्रार्थना आपण करतो. आपली जननी व जन्मभूमी ही स्वर्गाहूनही मोठी असून तिची काळजी घ्या. नातीगोती जपा. माती जगली तर संस्कृती जगेल. फक्त पैशावर माणूस जगत नाही, हे ध्यानात ठेवा. आई-वडिलांची काळजी घ्या. वृद्धाश्रम व तुरुंगांना भेटी द्या. म्हणजे भविष्यात तुमचे पाय तिकडे वळणार नाहीत."

जीवनातील विधायक काम तरुण वयात असताना करायला हवे, त्यासाठी चांगले शिक्षण घ्यायला हवे. ज्या शिक्षणामुळे आपल्या जीवनात, समाजात, देशात व मानवतेत बदल घडून येतो ते खरे शिक्षण असते. कारण, समाज व देश सुरक्षित राहण्यासाठी चांगली माणसे गरजेची असून, त्यासाठी ज्ञानाधारित शिक्षणाची गरज आहे. जीवनाला काम, लोभ, क्रोध, मद, मोह, मत्सर या विकारांनी घेरले असून, सगळ्या समस्या यातूनच तयार झाल्या आहेत. अनेकदा रागाच्या भरात गुन्हे घडतात आणि संपूर्ण भविष्य खराब होते. त्याला आळा मिळविण्यासाठी मनावर नियंत्रण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. उमेश जगताप यांनी करून दिला, तर आभार कोमल पडवळ हिने मानले.



राजगुरुनगर (ता. खेड) : 'तरुणाईचे उत्तरदायित्व' या विषयावर बोलताना डॉ. भूषण कुमार उपाध्याय.

संध्या | शुक्रवार, दि. ३ फेब्रुवारी २०१७ | ७

# 'चारित्र्य संवर्धनासाठी चांगले विचार आवश्यक': डॉ. भूषण कुमार उपाध्याय

राजगुरुनगर, (किरण खुडे) :

कोणत्याही व्यक्तिचे यश हे त्याच्या चरित्र व चारित्र्यावर अवलंबून असून, यासाठी चांगले विचार, वाणी आणि कर्म गरजेचे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या कारागृह व सुधारसेवा विभागाचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. भूषण कुमार उपाध्याय यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत तरुणाईचे उत्तरदायित्व याविषयावर बोलत होते.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ व मोठ्या विद्यार्थी उपस्थित होते.



डॉ. भूषण कुमार उपाध्याय पुढे बोलताना म्हणाले की, जीवनातील विधायक काम तरुण वयात असताना करायला हवे. त्यासाठी चांगले शिक्षण घ्यायला हवे. हल्लीच्या शिक्षणातून फक्त माहिती मिळते ज्ञान मिळत नाही अशी खंत व्यक्त करून त्यांनी ज्या शिक्षणामुळे आपल्या जीवनात, समाजात, देशात व मानवतेत बदल घडून येतो ते खरे शिक्षण असते. जे शिकवलं जातं ते मुलांना पटलं पाहिजे. त्यातून योग्य अयोग्य काय याचा निर्णय मुलांना करता यायला हवा. त्यासाठी आपण जे शिकतो त्याचे ज्ञानात रूपांतर करायला हवे. कारण समाज व देश सुरक्षित राहण्यासाठी चांगली माणसे गरजेची असून त्यासाठी ज्ञानाधारित शिक्षणाची गरज आहे. जीवनाला काम, लोभ, क्रोध, मद, मोह, मत्सर या षडविकारांनी घेरले असून, सगळ्या समस्या या षडरिपूंतून तयार झाल्या आहेत. त्यावर ताबा मिळवण्यासाठी मनाचे व्यवस्थापन आवश्यक असून, अभ्यासाने मनावर नियंत्रण ठेवता येते, असे त्यांनी सांगितले.

गुन्हेगारीबद्दल माहिती सांगताना ते म्हणाले की, ९५ टके गुन्हामधील कैदी गुन्हेगार नसतात. त्यांच्याकडून रागाच्या भरात गुन्हा झालेला असतो. त्याचा परिणाम; मात्र आपल्या भविष्यावर होतो. त्यासाठी मनावर नियंत्रण आवश्यक असल्याचे ते म्हणाले. समाजात धार्मिक सहिष्णुता आवश्यक असून त्यासाठी आपापल्या धर्मांची मार्गदर्शक तत्त्वे समजून घेऊन मग धर्मांचा अर्थ लावा असे ते म्हणाले. 'सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः' हि आपली संस्कृती आणि हे विश्वची माझे घर हा संतविचार आपण अंगिकारण्याची गरज व्यक्त केली. या वेळी 'ना तुम हिंदू बनेगा ना मुस्लिम बनेगा, इन्सान की औलाद तू इन्सान ही बनेगा' या ओळी सादर केल्या. तरुण मुलामुलींना आवाहन करताना ते म्हणाले की, जननी व जन्मभूमी ही स्वर्गाहूनही मोठी असून तीची काळजी घ्या. नातीगोती जपा. माती जगली तर संस्कृती जगेल. फक्त पैशावर माणूस जगत नाही. हे ध्यानात ठेवा. आईवडिलांची काळजी घ्या. वृद्धाश्रम व तुरुंगांना भेटी द्या म्हणजे भविष्यात तुमचे पाय तिकडे वळणार नाही. आजचा तरुणच या देशाला पुढे नेऊ शकतो. त्यासाठी उत्तरदायित्वाची भावना मनात जिवंत ठेवा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. उमेश जगताप यांनी केला, तर आभार कु. कोमल पडवळ या विद्यार्थिनीने मानले.

